## सामान्य प्रशासन विभाग

### जाहिरात

**क्र. एमपीआर/7814 दि. 14.08.2024**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्याच्या आस्थापनेवरील गट 'क' मधील रु.25,500-81,100 (Pay Matrix-M15) अधिक अनुज्ञेय भत्ते या सुधारित वेतनश्रेणीतील 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनामः लिपिक) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली 1846 रिक्तपदे सरळसेवेने भरण्यासाठी, सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता / पात्रता धारण करीत असलेल्या पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/Careers-All/Recruitment/Chief Personnel Officer या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात, अटी व शर्तीसह प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर जाहिरात दि.20.08.2024 ते दि.09.09.2024 या कालावधीकरिता संकेतस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसरुन सदर पदासाठीची विहित अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छुक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर भेट देऊन, जाहिरातीसोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन, विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज, ऑनलाईन पध्दतीने, विहित वेळेत सादर करावा. उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वतः जवळ ठेवावी. उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ कॉलसेंटर, भ्रमणध्वनी क्रमांकः 9513253233 सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00 या वेळेत (दुपारी 01.30 ते 02.30 जेवणाची वेळ), सोमवार ते शनिवार उपलब्ध असेल.

| | |
|---|---|
| पदाचे नावः- | **"कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनामः लिपिक)** |
| वेतनश्रेणी (सुधारित):- | **स्तर-M15- रु.25,500-81,100** |
| भरावयाच्या रिक्त पदांची संख्याः- | **1846** |
| गटः- | **क** |

**उपलब्ध रिक्त पदांचा तसेच सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

**(1) सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची रिक्त पदे**

| तपशील | अ जा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | सा.शै.मा.व. | खुला/ अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | 142 | 150 | 49 | 54 | 39 | 38 | 46 | 452 | 185 | 185 | 506 | 1846 |

**(2) समांतर आरक्षणांतर्गत भरावयाची पदे**

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | सा.शै. मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 47 | 48 | 17 | 18 | 12 | 12 | 15 | 148 | 60 | 60 | 167 | 604 |
| महिला 30% | 43 | 45 | 15 | 16 | 12 | 11 | 14 | 136 | 56 | 56 | 152 | 556 |
| माजी सैनिक 15% | 21 | 23 | 7 | 8 | 6 | 6 | 7 | 68 | 28 | 28 | 76 | 278 |
| प्रकल्पग्रस्त 5% | 7 | 8 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 23 | 9 | 9 | 25 | 92 |
| भूकंपग्रस्त 2% | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 9 | 4 | 4 | 10 | 38 |
| खेळाडू 5% | 7 | 8 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 23 | 9 | 9 | 25 | 92 |
| अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार) 10% | 14 | 15 | 5 | 5 | 4 | 4 | 5 | 45 | 19 | 19 | 51 | 186 |
| एकूण | 142 | 150* | 49 | 54 | 39 | 38 | 46* | 452 | 185 | 185 | 506 | 1846 |
| अनाथ मुलांसाठी(1%) | 18 पदे आरक्षित होत आहेत.<br>परिपत्रक क्र. एमबीसी/9476 दि.26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि. 06.04.2023 अन्वये प्राप्त निर्देशानुसार, 18 पदांपैकी **संस्थात्मक प्रवर्गाकरिता-09 पदे व संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता-09 पदे आरक्षित होत आहेत.** | | | | | | | | | | | |
| दिव्यांगांसाठी(4%) | 73.84 = पूर्णांकात 74 पदे आरक्षित होत आहेत (अ-19, ब - 19, क - 18, ड/ई-18) | | | | | | | | | | | |

* अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेली कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनामः लिपिक) व तत्सम संवर्गातील 15 पदे (अज -10, विमाप्र-05) भरण्याकरिता एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.

**सही/- दि.14.08.2024**